'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# १९९० नंतरच्या प्रसिध्द लेखकांच्या पत्नींचे आत्मचरित्रे

डॉ.एस. पी. पैकेकरी
असि. प्रोफेसर,
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत,
जिल्हा- अहमदनगर
मो.नंबर ९८२२४७०९०३
sngitapaikekari@gmail.com

आत्मचरित्र हा वाड.मय प्रकार ललित गद्यातील वाड.मय प्रकार आहे. आत्मचरित्र लिहिणारी व्यक्ती आपले चरित्र हेतूतः लिहित असते. आत्मचरित्र लिहिणा-या व्यक्तीने इतरांहून वेगळे अनुभव जीवनात घेतलेले असतात. ते अनुभव त्यांना कोणालातरी सांगावेशे वाटतात. तो किंवा ती व्यक्ती आत्मचरित्र लिहिण्याचा कयास करतात. ब-याचदा असे ही दिसते की कोणाच्यातरी प्रोत्साहनाने आत्मचरित्राचे लेखन केले जाते. आत्मचरित्र हा वाड.मय प्रकार १८७० नंतर मराठी वाड.मयात रुढ झाला. दादोबा पांडूरंग यांचे आत्मचरित्र हे पहिले आत्मचरित्र म्हणावे लागेल. स्त्री लेखिकांचा विचार करताना रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे पहिले आत्मचरित्र आहे.

प्रस्तुत निंबधात स्त्रियांच्या आत्मचरित्रातील परिवर्तने या विषयावर मांडणी करणार आहे. पिढयांपिढया शिक्षणापासून वंचित राहिलेल्या स्त्रियांना महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, यांच्या प्रेरणेने शिक्षण मिळू लागले तर काही समाज सुधारकांनी स्वतःच्या पत्नीला शिकविण्यास सुरुवात करुन त्यांना चालना दिली. म्हणून रमाबाई रानडे यांना स्त्रीयांच्या आत्मचरित्रातील पहिले आत्मचरित्र लिहिले.

आत्मचरित्राच्या व्याख्या –

१. स्वतःच्या जीवनाची स्वतः लिहिलेली कहाणीश – डॉ. बोरगावकर

२.स्वतःच्या जीवनाचे दुरस्थपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्या विषयीचे प्रांजल निवेदन म्हणजे आत्मचरित्रश – सदा क-हाडे.

३.स्वजीवन तटस्थपणे, न्याहळून त्यातून आवश्यक त्या बाबींची निवड करुन त्यांचे प्रांजल निवेदन व कलात्मक मांडणी यातून स्वचरित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्रश.- डॉ. विमल भालेराव.

४. आत्मचरित्र म्हणजे मला काही सांगायचे आहे किंवा हे मी सांगितलेच पाहिजे, मला ठेच लागली पुढच्या पिढीने सावरावे या साठी लिहिलेले स्वःकथन म्हणजेच आत्मचरित्र होय. अशी एक सोपी व्याख्या करता येईल.

१९९० नंतरच्या आत्मचरित्रकार स्त्रिया परंपरेच्या चौकटीत राहूनच लेखन करताना दिसतात पण हे करत असताना शिक्षणाने जाणीव जागृतीने लिहिण्याचा थोडासा विचार करतात.

हिंदु कोड बीलाने महिलांना बरेच अधिकार बहाल केले व त्यामुळे आमची स्त्री स्वतंत्रपणे विचार तर करु लागली आणि शिक्षणाने स्त्रियांना विचार करण्यास भाग पाडले म्हणून ती आत्मचरित्रातून थोडीशी धाडसाने व्यक्त होताना दिसते.



Scanned with CamScanner

**प्रसिध्द लेखकाच्या पत्नीचे आत्मचरित्रे :-**

मराठी साहित्यात प्रसिध्दांच्या शिखरावर असणा-या लेखकांच्या पत्नीनी आत्मचरित्रे लिहिली ती आत्मचरित्रे लिहिताना पतीचेच चरित्र मांडणे हा हेतू दिसून येतो. शिवाय असे ही दिसते की, त्या लेखकांना वेळ नाही म्हणून त्यांच्या पत्नीनी स्वतःचे चरित्र लिहिताना नव-याचेच चरित्र लिहिले नव-याचे यश त्यांच्या साहित्याचा मोठेपणाच व्यक्त केल्याचे दिसते. मलिका शेख यांनी म्हटल्याप्रमाणे 'एका पुरुषा पलीकडे मी का जाउ शकत नाही'. याच मताप्रमाणे समाजातील प्रत्येक स्त्री नव-याच्याच भोवती फिरत राहते तिचे स्वतःचे वेगळे विश्व जरी असले तरी ती कुटुंब व त्या बरोबर नवरा हाच विषय मांडते कारण ही भारतीय संस्कृतीच आहे.

निवडलेल्या काही आत्मचरित्रात काही स्त्रियांनी स्वतःचे जीवन मांडण्याचा प्रयत्न केला. पण स्त्री ही नव-यावरुनच शक्यतो ओळखली जाते त्यामुळे एका मोठया वृक्षाखाली छोटे रोपटे वाढत नाही व वाढताना दिसतही नाही. असेच या निवडलेल्या आत्मचरित्रांचे रुप आहे.

**'आहे मनोहर तरी'** लिहिणा-या सुनिता देशपांडेचे स्वतःचे विश्व आहे. स्वतःचा विचार आहे. स्वतःचे स्वातंय चळवळीतील काम आहे पण सुनिताबाईंना पुलंची पत्नी म्हणूनच ओळखतात. प्रस्तुत आत्मचरित्र वाचल्यानंतर सुनिताबाईंचे व्यक्तीमत्व किती समृध्द आहे हे मनोमन जानवत राहते.

सर्जनशील अफाट क्षमता, संवदेनशील रसिकता आणि वैचारिक भान असणा-या सुनिताबाईंच्या व्यक्तीमत्वाची, त्यांच्यातील जीवंत मनाच्या कलावंताची घुसमट झाली हेच त्यांनी पुल वरोबरच्या रम्य सहजीवनात उदास वाटणा-यांचे मर्म बधांतले दुःख आहे आणि ते त्यांनी अत्यंत कलात्मक पध्दतीने आपल्या आत्मचरित्रातून अभिव्यक्त केले आहे. सुनिताबाई बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. लग्न संसार, पती, पत्नी मधला नातेसंबंध, मैत्री आणि मध्यमवर्गीयांचे नाते संबंध यांच्या विषयी सुनिताबाईनी केलेले मुक्त चिंतन आत्मचरित्राला तत्वज्ञानाची उब देणारे आहे. आत्मभान आणि आत्मविश्वास यांच्या दृष्टीने पाहता हे आत्मचरित्र लाक्षणीय आहे.

**बंध अनुबंध :-**

कमल पाध्ये यांनी 'बंध अनुबंध' या आत्मचरित्रातून स्त्रियांचे मूलभूत प्रश्न मांडले व पुरुषांच्या दृष्टिकोनातून स्त्रीचे अस्तित्व काय असते या विषयी ही त्यांनी आपली परखड मते मांडली. त्यांनी माणसांची व्याख्या केली. 'जो विचार करु शकतो, ज्याला जाणीव आहे, ज्याला स्वत्वाची जाणीव आहे तो माणूस' त्यांनी पतीपत्नीच्या नात्याबददल ही लिहिले आहे. 'पती पत्नीच नातच फसवेपणा जोपासणारे'. हे आत्मचरित्र एक व्यक्ती म्हणून, स्त्री म्हणून, जाणीव जागृत असलेल्या स्त्रीचे आहे. व ते ही एका उच्चवर्णीय जातीतील स्त्रीचे., महत्वाचा भाग म्हणजे कमल पाध्ये या एक विचारी कर्तृत्ववान समंजस व सामर्थ्यवान स्त्री आहेत. त्यांनी स्वतःचे विचार, स्वतःचे जीवन स्वतःच्या पध्दतीने जगण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्त्री जाणीवेबददल सखोल भाष्य केले. बंध अनुबंध हे पती चरित्र नसून एका विचार करणा-या स्त्रीचे चरित्र आहे. घर संसार पती यांच्या विषयी लिहिताना त्यांनी स्वतःला केंद्रस्थानी ठेवले आहे हे या आत्मचरित्राचे वैशिष्टय आहे.

**मी भरुन पावले :-**

हे आत्मचरित्र मेहरुन्निसा दलवाई यांचे आहे. हे आत्मचरित्र स्त्री जाणीवेच्या परिप्रेक्ष्यातून सर्वात वेगळे आत्मचरित्र आहे. मेहरुन्निसा बाईंना त्यांच्या वैवाहिक जीवनात एक स्त्री म्हणून संघर्ष करण्याची वेळ कधीच



Scanned with CamScanner

आली नाही कारण त्यांचे पती हमीद दलवाई हे परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते विचारवंत होते. मुस्लिम असुन ते सच्चे पुरोगामी होते. एवढयावरच त्यांचे मोठेपण थांबत नाही तर त्यांनी मेहरुन्निसा बाईंना पत्नी म्हणून दु्यम लेखले नाही. कायम त्यांनी समानतेची व सन्मानाची वागणूक दिली. अशा उत्तुंग व्यक्तिमत्वाची सहचारिणी झाल्याबददल 'मी भरुन पावले' असं मेहरुनिस्सा बाई म्हणतात. अर्थातच हमीद दलवाईचे असे पुरोगामी विचार मेहरुन्निसाबाईंनी आत्मसात केले. किंबहुना त्यांच्या पाश्चात त्यांचे कार्य पुढे चालू ठेवले यावरुन त्यांचे मोठेपण दिसून येते. तलाक पिडीत मुस्लिम स्त्रियांसाठी त्यांनी केलेले भरीव कार्य, त्यानंतर सत्यशोधक मुस्लिम समाजाची त्यांनी पेललेली जबाबदारी स्त्रीवादी चळवळीला एकूणच पुरोगामी चळवळीला चालना देणारी आहे.

रास –

सुमा करंदिकराच्या आत्मचरित्रातील पहिलेच वाक्य आहे. श्मी सध्या सुमा करंदिकर पण मुळची कुसूम दामले व नंतरची सौ. जोत्स्ना सानेश असे आहे. या वाक्याला तत्कालीन विधवा विवाहाचा सामाजिक संदर्भ आहे. सुमाताई विधवा आणि विंदा करंदिकर विधूर आणि म्हणून या दोघांचा विवाह ही एक पुरोगामी घटना सुमाताईच्या आयुष्यामधील एक प्रभावशाली घटना आहे. या घटनेपासूनच त्यांच्या जीवनावर विंदा करंदिकरांचा प्रभाव असल्याचे स्पष्ट दिसते. लग्नानंतर त्यांनी शिक्षण पूर्ण केले त्या शिक्षिका झाल्या याचाच अर्थ त्या आत्मभान असणा-या स्त्री होत्या. घरकाम करणा-या, नोकरी करणा-या, स्त्रियांच्या संदर्भात त्यांनी मूलगामी चिंतन केले आहे. स्त्रियांना घरची सर्व जबाबदारी पाहून पार्टटाईम नोकरी सरकारने द्यावी कारण एकदा लग्न करुन संसार मांडल्यावर संसार सुखी करायचा असेल तर अशा संकुचित व्यक्तिविकासाचा विचार करुन चालत नाही. पगाराचा चेक नोकराला देताना त्यातील वीस टक्क्याचा चेक कायादयानुसार पगार देणा-यानेच नोकराच्या पत्नीच्या नावाने काढणे अटळ झाले पाहिजे ते पैसे तिच्याखात्यावर जमा होतील तिला ते केव्हाही काढता येतील व तिच्या सही शिवाय ते इतर कोणाला मिळू शकणार नाही असे झाले पाहिजे. त्यामुळे सामान्य गृहिणींनाही आर्थिक स्वातंत्र व त्यांच्या कामाला प्रतिष्ठा मिळेल. या वाक्यावरुन सुमाताईंनी स्त्री जीवनाचा विचार श्रम आणि आर्थिक दृष्टिकोनातून केला असल्याचे दिसून येते. त्यांच्या ठायी असलेली ही स्त्री जाणीव महत्वाची आहे.

कुणास्तव कुणीतरी –

या आत्मचरित्राच्या शीर्षकावरुन आत्मचरित्राच्या अंतरंगाचा अंदाज येतो. कुणास्तव कुणीतरी म्हणजे कुणासाठी कुणीतरी आपले आयुष्य वाट पाहण्यात खर्च करते. यशोदाबाईंनी वाट पाहिली. सुखी संसाराची, पतीच्या प्रेमाची पण त्यांच्या वाटयाला पतीचे प्रेम कसले ते आलेच नाही. यशोदाबाईंच्या आत्मचरित्रातन त्यांची ही वेदना, भळभळताना दिसते. संसारात पत्नीची कुचंबना कशी होते, उपेक्षा कशी होते, नव-याने तिला प्रेमाची वागणूक दिली नाही तर तिच्या मनाची तडफड कशी होते हे सर्व यशोदाबाईंच्या आत्मचरित्रात पहावयास मिळते.

आकाशाशी जडले नाते :-

आकाशाशी जडले नाते हे विद्याताई माडगूळकरांचे आत्मचरित्र आहे. प्रस्तुत आत्मचरित्रात त्यांनी ग. दि. माडगुळकर यांना आकाशाची उपमा दिली आहे. गदिमांसारखा कवी त्यांना आकाशाएवढा वाटतो. एकवेळ मान्य करता येईल. आकाशाशी नाते जडल्यानंतर विद्याताईंनी आपले गाणे बंद केले हे वास्तव मात्र अस्वस्थ



Scanned with CamScanner

करणारे आहे. या संदर्भात त्यांनी जे मत व्यक्त केले ते मननीय आहे. लग्न झाल्यापासून कविराजांनी मला पुढे गाणे चालू ठेव असे उत्तेजन दिले नाही आणि गाणे गाउ नको असे ही कधी सांगितले नाही. माझे गाणे सोडण्याचा निर्णय त्यांना कळला त्यावरही त्यांनी काही मत प्रदर्शन केले नाही'. त्यांची पारंपारीक मते लक्षात घेता त्यांना तो निर्णय आवडला असावा असे आज मला वाटते. माझा निर्णय किती योग्य ते कालांतराने सिध्द झाले.

मास्तरांची सावली -

कृष्णाबाई सुर्वेचे हे आत्मचरित्र, रुढ अर्थाने हे पती चरित्र आहे. एका कवीचा मोठेपणा सच्चेपणा जीवन रेखाटले आहे. मास्तरांची सावली म्हणजे नारायण सुर्वे यांची सावली म्हणजे कृष्णाबाईच्या मते असा एक अर्थ होतो. कारण कृष्णाबाईंनी नारायण सुर्वे यांना समर्थपणे साथ दिली म्हणूनच नारायण सुर्वे एक कवी म्हणून प्रसिध्द पावले. घराची व सुर्वे यांची सर्व जबाबदारी कृष्णाबाई सुर्वे यांनी सांभाळली, पेलली.

कृष्णाबाई सुर्वे एका मुलाखतीत म्हणतात की, माझया अगोदर माझे पती म्हणजे मास्तरांना मृत्यू यावा म्हणजे त्यांचे माझ्या माघारी हाल होणार नाहीत याला पती पत्नीतील प्रेम म्हणतात. खूप हालाखीत सुर्वे कुटुंब जगले ते हाल कृष्णाबाईंनी निरपेक्षपणे मांडले आहे. मास्तरांची सावलीने सुर्वेची ओळख होते व नारायण सुर्वेचा मोठेपणाही दिसतो. व कृष्णाबाईंचा सरळ स्वभाव व स्पष्ट वक्तेपणा दिसून येतो.

समारोप -

वरील सर्व आत्मचरित्राचा विचार केल्यास जाणवते की, सुनिता देशपांडे यांनी पुलचे जे चरित्र मांडले ते फार महत्वाचे आहेत. त्यांच्या स्वतःचे जे जीवन रेखाटले यावरुन वाटत राहिले की मोठया झाडाखाली छोटे झाड वाढत नाही ते रोपटेच राहते. त्याच प्रमाणे कमल पाध्ये नी 'बंध अनुबंध' मध्ये जे विचार मांडले ते खूप महत्वाचे आहेत त्यांनी स्वतःकडे समाजाकडे स्त्री जाणीवेतून पाहिले व काही प्रश्नांची चर्चा केली व स्वतःचे विचारपूर्वक मत मांडले. 'मी भरुनी पावले या आत्मचरित्रात मेहरुन्निसा दलवाईंनी जे चित्रण मांडले त्यातून हमीद दलवाई अभ्यासकांना जास्त समजत जातात. रासमध्ये सुमा करंदिकरांनी पतीचे गोडवेच गायिले पण एक शिक्षित स्त्री शिक्षिका व त्या घर व नोकरी सांभाळणारी स्त्री म्हणून महत्वाच्या मताचा आढावा घेतला. नव-याच्या पगारातील काही भाग पत्नीला मिळावा या महत्वाच्या विषयाला वाचा फोडली. 'कुणास्तव कुणीतरी' या आत्मचरित्रात यशोदा पाडगावकरांनी स्वतःचे विचार , अस्तित्व प्रकट करण्याचा प्रयत्न केला. 'आकाशाशी जडले नाते' हे आत्मचरित्र मात्र पूर्ण पती चरित्रच आहे. त्यामध्ये विद्याताई कोठेच माणूस म्हणून सापडत नाहीत पत्नीम्हणून सापडतात. आणि 'मास्तरांची सावली' या नारायण सुर्वे यांच्या पत्नीच्या आत्मचरित्रातून नारायण सुर्वे माणूस म्हणून किती श्रेष्ठ होते हे सांगितले आहे. हे जरी पती चरित्र वाटत असले तरी यात कृष्णाबाईंची स्वतंत्र विचारसरणी व सर्वांना संपूर्ण पणे दिलेले पाठबळ दिसून येते.

अशा पध्दतीने निवडलेल्या आत्मचरित्रात परिवर्तने दिसून येतात.

संदर्भ ग्रंथ -

१. सुर्वे कृष्णाबाई, मास्तराची सावली, डिंपल पब्लिकेशन मुंबई २००६.
२. देशपांडे सुनिता, आहे मनोहर तरी, मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९०
३. दलवाई महेरुन्निसा, मी भरुन पावले आहे, साधना प्रकाशन, पुणे १९९५
४. सुमा करंदीकर, रास, मौज प्रकाशन, मुंबई १९९८
५. पाडगावकर यशोदा, कुणास्तव कुणीतरी, राजहंस प्रकाशन, पुणे २०००
६. माडगुळकर विद्या, आकाशाशी जडले नाते, गदीमा प्रकाशन, पुणे १९९६



Scanned with CamScanner